आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२३ ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्याशी द्विपक्षीय चर्चा, दोन्ही देशांमधले मतभेद आणि विवाद योग्यरित्या हाताळण्याची गरज प्रधानमंत्र्यांकडून व्यक्त
- एकत्र येत दहशतवाद आणि दहशतवादाला रसद पुरवणाऱ्या यंत्रणेशी सामना करावा, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं ब्रिक्स देशांना आवाहन
- महाविकास आघाडीतले तिन्ही पक्ष प्रत्येकी ८५ जागा लढवणार, इतर जागा मित्र पक्षांना देण्याची चर्चा

  **आणि**

- ५५व्या इफ्फीमध्ये ऑस्ट्रेलिया ‘कंट्री ऑफ फोकस’ राहणार

**<><><><><>**

भारत आणि चीनमधले मतभेद आणि विवाद योग्यरित्या हाताळून शांतता बिघडू न देणं अत्यावश्यक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज अधोरेखित केलं. कझान इथं सोळाव्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री मोदी यांनी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक घेतली. या बैठकीत भारत-चीन सीमाप्रश्नावर तोडगा काढून शांतता प्रस्थापित करण्यासाठी दोन्ही देशांचे विशेष प्रतिनिधी लवकरच भेटतील, असं निश्चित करण्यात आलं. भारत आणि चीन यांच्यातल्या स्थिर आणि सौहार्दपूर्ण द्विपक्षीय संबंधांचा प्रादेशिक आणि जागतिक शांतता तसंच समृद्धीवर सकारात्मक परिणाम होईल, असं प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

ब्रिक्स देशांनी एकत्र येत दहशतवाद आणि दहशतवादाला रसद पुरवणाऱ्या यंत्रणेशी सामना करावा असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. तसंच या मुद्यांवर दुहेरी निष्ठेला बिलकुल जागा नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. रशियामधल्या कझान इथं १६व्या ब्रिक्स परिषदेच्या सत्राला ते संबोधित करत होते. युवकांमध्ये वाढता कट्टरतावाद रोखण्यासाठी पावलं उचलण्याची गरज असल्याचं सांगत संयुक्त राष्ट्राच्या अधिवेशनात झालेल्या दहशतवादविरोधी ठरावांवर ठोस काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. सायबर सुरक्षेसाठी उपाययोजना करणं आवश्यक असल्याचं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

भारत हा युद्धाच्या बाजूने नसून संवादाच्या बाजूने असल्याचं प्रधानमंत्र्यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केलं. महागाई आटोक्यात आणणं, अन्नसुरक्षा, ऊर्जा, आरोग्य हे सर्व देशांसाठी प्राधान्याचे मुद्दे आहेत, असं प्रधानमंत्री म्हणाले.  ब्रिक्स समूह हा जनहितवादी गट आहे, असा संदेश जगाला दिला जावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचं जागावाटप झालं आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हे तिन्ही प्रमुख पक्ष प्रत्येकी ८५ जागा लढवतील, अशी माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली.

**होल्ड बाईट - संजय राऊत**

१८ जागा मित्र पक्षांना देण्यासंदर्भात उद्यापासून चर्चेला सुरुवात होईल, असंही राऊत यावेळी म्हणाले. या जागांवर मुख्य तीन पक्षांपैकी कुठल्याही पक्षाने दावा केल्यास तो प्रश्न चर्चेने सोडवला जाईल, अशी माहितीही राऊत यांनी दिली. यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील उपस्थित होते.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज ६५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघात केदार दिघे यांना रिंगणात उतरवलं आहे. ठाण्यातून राजन विचारे, दिंडोशीतून सुनील प्रभू, अंधेरी पूर्वमधून ऋतुजा लटके, तर वरळीतून आदित्य ठाकरे निवडणुकीच्या रिंगणात असतील. गुहागरमधून भास्कर जाधव, वांद्रे पूर्वमधून वरूण सरदेसाई, कुडाळमधून वैभव नाईक, तर राजापूरमधून राजन साळवी निवडणूक लढवणार आहेत. नेवासामधून शंकरराव गडाख, बार्शीतून दिलीप सोपल, सावंतवाडीतून राजन तेली, राधानगरीतू के. पी. पाटील आणि शाहुवाडीतून सत्यजित पाटील यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

माहिममधून मनसेचे अमित ठाकरे यांच्या विरोधात उद्धव ठाकरे यांच्याकडून महेश सावंत उमेदवार आहेत. शिवसेनेकडून तिथून सदा सरवणकर रिंगणात आहेत.

**<><><><><>**

**राष्ट्रवादी काँग्रेस** पक्षानं ३८ उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे अध्यक्ष अजित पवार बारामती विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. छगन भुजबळ येवल्यातून, दिलीप

वळसे पाटील आंबेगाव इथून, हसन मुश्रीफ कागलमधून, तर धनंजय मुंडे परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांना दिंडोरीतून, धर्मराव आत्राम यांना अहेरीतून, तर अदिती तटकरे यांना श्रीवर्धन इथून राष्ट्रवादीनं उमेदवारी जाहीर केली आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या **मुंबई पश्चिम उपनगरातल्या** मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

केरळमधल्या वायनाड मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाकडून प्रियांका गांधी यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. त्याआधी त्या कलपेट्टा इथं आयोजित केलेल्या रोड शो मध्ये सहभागी झाल्या. वायनाडचा भाग होणं ही आपल्यासाठी आनंद आणि सन्मानाची बाब असल्याचं यावेळी प्रियांका गांधी म्हणाल्या. यावेळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी उपस्थित होते. राहुल गांधी यांनी वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे ही जागा रिक्त झाली आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या २८८ मतदारसंघात आतापर्यंत १५३ उमेदवारांनी १६४ अर्ज भरले आहेत. आज १०४ उमेदवारांनी १२२ अर्ज भरले आहेत.

<><><><><>

मथुरामधल्या शाही ईदगाह - श्रीकृष्ण जन्मभूमी प्रकरणी सर्व दिवाणी खटल्यांची एकाच वेळी सुनावणी घेण्याचे आदेश मागे घेण्याची मागणी करणारी याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयानं आज फेटाळून लावली. न्यायमूर्ती मयंककुमार जैन यांच्या अध्यक्षतेखालील पीठानं न्यायालयीन कार्यक्षमतेचा हवाला देत या प्रकरणांची एकत्रित सुनावणी व्हावी असा निर्णय दिला. सर्व १८ प्रकरणांची एकत्रित सुनावणी घेण्याच्या आदेशाचा फेरविचार करण्यासाठी ही याचिका दाखल करण्यात आली होती.

<><><><><>

देशातल्या नागरिकांकडून रोख रकमेचा वापर कमी होत असल्याचं रिझर्व्ह बँकेनं म्हटलंय. गेल्या ३ वर्षात डिजिटल व्यवहारांचं प्रमाण १९ टक्क्यांवरून ४८ टक्क्यांपर्यंत वाढलं आहे. यात यूपीआयचा वाटा महत्त्वाचा आहे, असं भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अर्थतज्ज्ञांच्या एका शोधनिबंधात म्हटलं आहे. २०१६ मध्ये सुरू झालेल्या यूपीआयचा गेल्या ५ वर्षांत किरकोळ डिजिटल व्यवहारांत सर्वाधिक वाटा आहे. खरेदी करताना डिजिटल पद्धतीनं पैसे देण्याचं प्रमाण ६ पटीनं वाढलं आहे. दोन व्यक्तींमधलं निधी हस्तांतरणंही मोठ्या प्रमाणात वाढल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

येत्या २० नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत गोवा इथं होणाऱ्या ५५व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ऑस्ट्रेलिया ‘कंट्री ऑफ फोकस’ राहणार आहे. ऑस्ट्रेलियाची वैविध्यपूर्ण सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि ओळख दाखवणारे ७ चित्रपट या महोत्सवात प्रदर्शित केले जाणार आहेत. फिल्म बजार, संयुक्तरित्या चित्रपट निर्मितीच्या संधी, ऑस्कर पुरस्कार विजेते सिनेमॅटोग्राफर जॉन सीएल महोत्सवात उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

**<><><><><>**

दाना चक्रीवादळ पार्श्वभूमीवर एनडीआरएफनं ओडिशात २० आणि पश्चिम बंगालमध्ये १३ पथकं तैनात केली आहेत. आंध्रप्रदेश, छत्तीसगड आणि झारखंडमध्येही राखीव पथकं ठेवण्यात आली आहेत. भारतीय तटरक्षक दलानं चक्रीवादळाच्या तडाख्यापासून जीवित आणि मालमत्तेचं नुकसान टाळण्यासाठी अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या आहेत. चक्रीवादळ धडकण्यापूर्वी आज जास्तीत जास्त लोकाचं स्थलांतर करण्यात येत आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज आहेत.